## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ [म्हाडाचा घटक]

**कोंकण मंडळ सोडत सन २०१८ मधील संकेत क्र. २७०,मौजे शिरढोण ,ता.कल्याण, जि,ठाणे येथील प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून पुढील सदनिकेचे वितरण व ताबा देण्याची कार्यवाही सुरू करणेबाबत.**

## जाहीर निवेदन

कोंकण मंडळ सोडत सन-२०१८ मध्ये संकेत क्र.२७० शिरढोण ता .कल्याण जि.ठाणे या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत इ.क्र.०१,०३,०४ व ०६ मधील एकुण १९०५ सदनिकांसाठी सोडत काढण्यात आली आहे.सदर प्रकल्पास सद्स्थितीत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

सदर प्रकल्पातील पात्र अर्जदारांना पणन/कोंकण मंडळ विभागामार्फत सदनिका विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी सन-२०१८ पासून तात्पुरते देकारपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि कोविड-१९ महामारीमुळे तसेच इतर तांत्रिक कारणास्तव योजनेतील इमारतीच्या बांधकाम प्रगतीवर परिणाम झाल्याने सदर प्रकल्पातील अर्जदारांना सदनिका विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी हप्ते सुधारित करण्यात आले आहे. त्यानुसार शेवटचा हप्ता (१० %) निवासी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर भरणा करण्याचे जाहीर निवेदन मा.उपाध्यक्ष/ प्रा यांच्या मान्यतेने सन-२०२१ मध्ये म्हाडा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.तरी सदर प्रकल्पास सद्स्थितीत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने **अर्जदारांना विक्री किंमतीचा शेवटचा हप्ता (१० %) भरणा करणेसाठी सदर निवेदनाव्दारे दि.३१.०१.२०२३ पर्यंत मुदत निर्धारित करण्यात येत आहे**.तरी ज्या अर्जदारांनी शेवटचा हप्ता भरणा अद्याप केलेला नाही अशा अर्जदारांनी शेवटचा हप्ता (१० %) भरणा दि.**३१.०१.२०२३** पर्यंत करावा जेणेकरुन संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर अर्जदारांना सदनिकेचे वितरण व ताबा देण्याची कार्यवाही करणे शक्य होईल.

तसेच सदर प्रकल्पास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त असून ज्या अर्जदारांनी सद्स्थितीत संपूर्ण रकमेचा (१००%) केलेला आहे अशा अर्जदारांना सदनिका वितरण व ताबा देण्याची कार्यवाही पणन विभाग/कोंकण मंडळ यांचेकडुन करण्यात येत आहे.तरी अशा अर्जदारांनी सदनिकेच्या वितरण व ताबा संदर्भात उपमुख्य अधिकारी /पणन/कों.मं. या कार्यालयाशी पुढील कार्यवाही करिता संपर्क साधावा . कृपया याची नोंद घ्यावी.

**मा.मुख्य अधिकारी/कों.मं. यांच्या मान्यतेने**

(कल्पना पवार)
उपमुख्य अधिकारी,
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई